**L. C. BILL No. VII OF 2023.**

A BILL

TO PROVIDE A SCHEME FOR ERADICATION OF UNEMPLOYMENT FROM THE STATE OF MAHARASHTRA

# सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.

**महाराष्ट्र राज्यात बेकारीचे निर्मुलन करण्यासंदर्भात योजनेची तरतूद करण्याकरिता विधेयक**

**ज्याअर्थी,** राज्यातील नागरिकांना नोकरीची हमी देण्याची आणि ज्यांना नोकरी मिळविणे शक्य झालेले नाही अशा लोकांना बेकारी भत्ता देण्याच्या प्रयोजनांकरिता, राज्यात बेकारीचे निर्मुलन करण्यासंदर्भात योजनेची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मुलन करण्याबाबत अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(२) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

(३) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

नागरिकांना नोकरी मिळण्यासाठी पात्रता **३.** राज्य शासनास, ज्या नागरिकांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत तसेच ज्यांनी सेवायोजन केंद्रात नोंद केलेली आहे अशा प्रत्येक बेरोजगार नागरिकास त्याचे वय, पात्रता आणि आरोग्य यास अनुसरून योग्य अशी नोकरी देता येईल.

बेकारी भत्ता देणे **४.** कलम ३ अन्वये बेरोजगार नागरिकाला नोकरीची तरतूद करण्यात येईपर्यंत, त्याला किंवा तिला विहित करण्यात आलेला बेकारी भत्ता देण्यात येईल.

बेकारी विमा योजना **५.** या अधिनियमान्वये, राज्य शासन, बेकारी भत्ता प्रदान करण्याकरिता विशेष निधीची तरतूद करण्यासंदर्भात बेकारी विमा योजना सुरू करील.

बेकारी विमा योजनेकरिता अंशदान **६.** या अधिनियमान्वये, ज्या नागरिकाने, त्याचे नाव सेवायोजन केंद्रामध्ये नोंदविले आहे, तो नागरिक नोकरी मिळाल्यानंतर लगेच विहित कालावधीकरिता बेकारी विमा योजनेत अंशदान देण्यासाठी करार सादर करण्याच्या अधीन राहून, विहित करण्यात येतील अशा दराने बेकारी भत्त्याचा लाभ मिळण्यास पात्र ठरेल.

नियम तयार करण्याचा अधिकार. **७.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पुर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमांन्वये प्रामुख्याने पुढील बाबींकरिता तरतूद करण्यात येईल :—

(क) कलम ४ मध्ये निर्दिष्ट केलेले बेकारी भत्त्याचे दर, पात्रता आणि कुशलतेच्या आधारावर वेगवेगळे दर विहित करता येतील ;

(ख) बेकारी विमा योजनेचे आवश्यक तपशील ;

(ग) कलम ६ अन्वये बेकारी विमा योजनेच्या करावयाच्या अंशदानाचा दर ;

(घ) या अधिनियमान्वये सर्व प्रकारचे प्रदान नियमाधीन करण्याची कार्यपद्धती ; आणि

(च) विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर असा निर्णय शासकीय **राजपत्रात** अधिसूचित प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती, येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(शा.म.मु.) एचबी २९००—२ (२००—३-२०२३)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यात बेकारीची समस्या तीव्र स्वरूपात वाढल्यामुळे सुशिक्षित नागरिकांना देखील आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे. देशात नोकरीची संधी मिळत नसल्यामुळे बुध्दीजीवी वर्ग परदेशात जाऊ लागल्यामुळे देशाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच, कुशल व अकुशल व्यक्तींचा लोंढा मोठ्या संख्येने परदेशात जात आहे. राज्यातील नागरिकांना नोकरीची हमी देण्याची आणि ज्यांना नोकरी मिळविणे शक्य झालेले नाही अशा लोकांना बेकारी भत्ता देण्याची तरतूद करण्याकरिता राज्याने ठोस प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. या प्रयोजनार्थ बेकारी विमा योजनेस प्रोत्साहन देणे देखील आवश्यक झाले आहे जेणेकरून या योजनेद्वारे बेरोजगारांच्या मदतीसाठी आर्थिक निधीची पूर्तता करणे इष्ट आहे.

वरील उद्दिष्टे साध्ये करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन**
मुंबई.
दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३.

**विलास पोतनीस,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (३).—** या खंडान्वये, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६(१).—** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

वर उल्लेखिलेले सर्व प्रस्ताव हे सामान्य स्वरूपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.]**

**[ महाराष्ट्र राज्यात बेकारीचे निर्मुलन करण्यासंदर्भात योजनेची तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. विलास पोतनीस,**
प्रभारी सदस्य.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई